**<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१०२/२०२५</u>**

(शासन वि. रोशन व ईतर)

**नि.क्र.०९ लगत**

**<u>शासनातर्फे सा.क्र.०४ यांची जबानी</u>**

**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

| | | |
|---|---|---|
| माझे पुर्ण नांव | : | प्रदिप चंद्रभान गजभिये, |
| वय | : | ३६ वर्ष, |
| व्यवसाय | : | मजूरी, |
| राहणार | : | बिजली नगर, सदर, नागपूर, ता. जि. नागपूर. |

**<u>सरतपास विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. टी. एस. आरगे यांचे मार्फत:</u>–**

**०१.** सन २०२३ मध्ये पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते तसेच माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. एक्साईज पोलीसांनी लोहापुल, नागपूर येथे माझी सही घेतली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखवला, त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही.

**<u>साक्षीदार आपल्या पुर्वीच्या जबाबापेक्षा विसंगत सांगत असल्यामुळे सहा. सरकारी वकीलांनी त्यास उलट तपासात अनुज्ञेय असणारी उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी मंजूर.</u>**

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २७/१०/२०२३ रोजी पोलीसांनी मला सावनेर हद्दीतील हॉटेल साईताज, दहेगाव येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष तीनही आरोपींची अंगझडती घेवून घटनास्थळावरुन ७५० मिली क्षमतेची रॉयल स्टॅग व्हीस्कीची सिल तुटलेली बाटली

त्यामध्ये अंदाजे ३०० मिली शिल्लक मद्य, ०२ प्लास्टीक मग्गे व ०६ दारु वासाचे काचेचे ग्लास माझ्यासमक्ष जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष घटनास्थळ तसेच जप्ती पंचनामा तयार केला, तो मला वाचून दाखवला व त्यानंतर मी त्यावर सही केली.

**०३.** **सरतपास पुर्ण**.

**उलट तपास आरोपीतर्फे – श्री. पी.एन.काळे, वकील.**

**०४.** **उलटतपास नाकारला**.

माझ्या समक्ष/श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2026.01.05 14:53:25 +0530

(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)

दिनांक– ०५/०१/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग

[न्यायालय क्र.१], सावनेर

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P. D. F. File is word to word as per original."

Name of Stenographer : S. A. Misal